# संपादकीय,

'नवज्योत' या आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रीकेच्या तमाम लेखक,वाचक आणि हितचिंतकास सदर अंक समर्पित करताना हर्ष होत आहे आपल्या पाठबळावर नवज्योतने नवव्या वर्षात यशस्वी पदार्पन करताना संशोधन पत्रिकेसाठी लागणारा Impact factor ६.०१३ इतका उच्च दर्जाचा प्राप्त केला आहे ही आम्हा संपादक मंडळास भुषणावह बाब आहे ई जर्नलच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला असून संशोधनाच्या पातळीवर तीव्र गतीने होणारे बदल स्विकारण्यासाठी संपादक मंडळ कटिबद्ध आहे.

वैश्विक पातळीवर तीव्र गतीने होणारे बदल आणि त्यांचे मानवी मुल्यांवर होणारे दूरगामी परिणाम चिंता व चिंतनाचा विषय झालेले आहेत. आपल्या देशाचा विचार करतांना अर्थव्यवस्थेसंबंध विविध पद्धतीने अभ्यास करणे आवश्यक आहे. भारतीय समाजावर राज्यशास्त्रा प्रमाणेच अर्थशास्त्राचाही प्रभाव पडत असतो.तसेच भारतीय राज्यघटनातील तरतुदींचा सामाजिक व राजकीय प्रभाव, अर्थ विषयक आयोग आणि भारतीय संघराज्य व्यवस्था याचा अभ्यास सध्यस्थितीत करणे आवश्यक आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीत व धोरणामध्ये लोकशाही व्यवस्थे समोरील ही विविध आव्हाने आहेत.

या संपूर्ण पार्श्वभूमीवर नवज्योतच्या शोध निबंधकारांनी आआपल्या विषयाची मांडणी केली असून त्यानुसार आंतरविद्याशाखीय विश्लेषनाच्या कक्षा अधिक व्यापक केल्या आहेत पर्यायाने या अंकाचा गुणात्मक दर्जासुद्धा उंचावला आहे.

नवज्योतचे सल्लागार मंडळ, संपादक मंडळ आणि मूल्यमापन समिती यांचे सक्रीय योगदान तसेच लेखक, वाचक व हितचिंतकच्या सहकार्यामुळे 'नवज्योत' आपला गुणात्मक दर्जा अधिक गतिमान करणार यात शंका नाही.

संपादक

प्रा.डॉ.संदीप तुंदूलवार